# अंतरिकता

शब्दांचा अर्थ
अर्थाची भावना
भावनांची ओंजळ
ओंजळीत पाणी
पाण्यातील प्रतिमा
प्रतिमेतील विश्वास
विश्वासातील व्यक्ती
व्यक्तीतील स्वभाव
स्वभावातील नम्रता

नम्रतेतील आदर
आदरातील भीती
भीतीमागची संकल्पना
संकल्पनेतील कृती
कृतीतील बोलणे
बोलण्यातील सप्ष्टीकरण
स्पष्टीकरणातील स्वर -व्यंजन
स्वर -व्यंजनातील बाराखडी
बाराखडीतील अक्षर

अक्षरांचा समूह
समूहातील वाक्य
वाक्यातील शुद्धलेखन
व्याकरणातील नियम
नियमातील शब्द
शब्दातील भावना
भावनांतील अर्थ
अर्थातील भावना कि भावनेतील अर्थ?

---

-- श्रुतिका होशिंग
शैक्षणिक वर्ष -२०१७-१९